# उपदेशामृत पद्यावली

ह.भ.प. वासुदेवराव महाराज देव
टेंभुर्णीकर

यांनी लिहिलेली पदे व भजने यांचा संग्रह

# उपदेशामृत पद्यावली

## ह. भ. प. वासुदेवराव महाराज देव टेंभुर्णीकर

यांनी लिहिलेली पदे व भजने यांचा संग्रह
श्रीसंत सद्‌गुरू वासुदेवराव देव महाराज टेंभुर्णीकर

# आरती

जय जय सत् चित् स्वरूपा जय सद् गुरूदेवा । जय वासुदेवा ।
आरती ओवाळीतो तुज भक्ति भावा ।।धृ.।।

टेंभुर्णी गांवा तूं अवतरलासी । प्रपंच करूनी तूं भक्ता उद्धरसी ।
भक्त वत्सल प्रेमी द्वैत नुरेसी । म्हणुनी शरण आलो तुझे चरणासी ।।१।।

भक्ताग्रहास्तव धरणे धरियले । समाधिस्त गुरूसी एकतुनी स्त्रवीले ।
पादुकांच्या शिळेतून औंदुबर उगवले । हाच गुरोशिर्वाद अनुग्रहा मिळे ।।२।।

बदनापुरी पन्नालाल तापडे आजारी । अन्नाविण मरणोन्मुख खिळला भूवरी ।
वारी पंढरीची ना चुको खंत भारी । ध्याता तुजसी प्रगटे विठ्ठलच घरी ।।३।।

सुलोचना तापडे ही बदनापुरी । कधी न होईल संतती सल्ला डॉक्टरी ।
शरणागतांचा भार वाहुनी शिरी । पुत्र फुल फुलले, वेली संसारी ।।४।।

कुळकर्णी केशव नानेगांवकर । वेडा झाला म्हणुनी होता रजेवर ।
करवुनी पत्नी करवी जप तूं अनिवार । बरा झाला, किती जप महिमा थोर ।।५।।

महंत अमरदास हिमालयवासी । तारूण्य लाभू न दे समाधि तपासी (तयासि) ।
वृद्धावस्था मागुनी वासुदेवासी । बदलले एकमेका बारा वर्षासी । ।।६।।

राजा देऊळगांवी किर्तन ठरलेले । नगरी होते म्हणून येऊ न शकले ।
संतासाठी देव हृदयीं स्त्रविले । पंढरीनाथ येऊनी किर्तन केले ।।७।।

सर्वा ठायीं तुझे वास्तव्य असुनी । ब्रह्म दाखविले तू माया छेदूनी ।
शरण तुज जाता भक्त तन्मणी । एकरूप होसी तूं भक्ता कारणी ।।८।।

ध्यास सदोदीत तुझा लागे अंतरी । दृष्टांत मिळे मज स्वप्नामाझारी ।
दासा यशवंताची वैखरी खरी । अंबा माऊली कृपा करी कमला वरी ।।९।।

**शिष्य डॉ. यशवंतराव (उर्फ) बाळासाहेब भुसनळे**

## पद – १

(चाल : भक्ति आकळीला दयाघना भ.)

**तुचि असे त्राता नरहरि तुचि असे त्राता ।।धृ.।।**

**तुजविण कवणा आळवू सदया ।**
**व्यर्थचि भगवंता ।।१।।**

**भवसागरी या अन्य न कोणी ।**
**तुजविण रक्षिता ।।२।।**

**संसार सुखद हा होय कृपेचि ।**
**तुझिया भगवंता ।।३।।**

**माता-पिता आणि बंधू कांता ।**
**ठेवी पदी आता ।।४।।**

**कृपा कटाक्षे जन्मोजन्मी ।**
**हो तू रक्षिता ।।५।।**

**वासुदेवा काहीच तुजविण ।**
**आस नसे आता ।।६।।**

## पद - २ (साखळी)
## (चाल : शरण तू जाई । जाई रे हरीला)

उमज तू काही, काही बाप्पारे ।

चकवी जन्म-मरण फेरे ।।

हित ते साधी, साधी लवकरी ।

काळ तो नाचे शिरावरी

भूल तुज पडली, पडली संसारी ।।

कोणी ना तुज येथे तारी ।

शास्त्री हे वचन, वचन बोलीले ।।

आप्तजन स्वार्थी हे सगळे ।

सावध होई, होई तू आता ।।

साधुनी घेई तुझ्या हिता ।

तरीच नरदेहीं, देही येऊनी ।।

शरण तू पांडुरंग चरणी ।

जाऊनी आता, आता सखया रे ।।

चुकवी जन्म-मरण फेरे ।

तरीच सार्थक, सार्थक तू केले ।।

येणे-जाणे संपविले ।

धन्य तू जाहला, जाहला संसारी ।।

वासुदेव तुझ्या आहारी येऊनी ठेला ।१।

## ३. अभंग

**चाल : (रूप पाहता लोचनी । सुख झाले वो साजनी)**

सत्य धर्म सोडू नका ।
वचन माझे इतुके ऐका ।१।

करा हाची उपकार ।
तरावया हा संसार ।२।

मुखी नाम सदा घ्यावे ।
इतुके दान मजसी द्यावे ।३।

वासुदेवा नलगे काही ।
एका हरिविण पाही ।४।

## ४. अभंग

(चाल : सदर)

येऊनिया नरदेही ।
हित ते करा आपुले काही ।१।

विषयीं मन गुंतू नका ।
शब्द माझा इतुका ऐका ।२।

जे का पडले विषय वनीं ।
त्याची सर्व झाली हानी ।३।

रावणादिका काय जाहले ।
याच पायी लया गेले ।४।

ऐसे देखोनिया डोळां ।
भूल कैसी पडली तुला ।५।

विषयी सुखी झाला कोण ।
द्यावा आम्हासी दावून ।६।

विषयी सुख नाही नाही ।
शास्त्रादिक देती ग्वाही ।७।

वासुदेव काकुलती ।
येऊनी सांगे तुम्हा प्रती ।८।

## ५. अभंग
## (चाल : रूप पाहता लोचनी)

सर्व शास्त्राचे ते सार ।
मनीं घ्यावा सर्वेश्वर ।१।

रामकृष्ण हरिहर ।
रूचेल ते घ्या निरंतर ।२।

कलीयुगीं साधन काहीं ।
नामापरते आणीक नाही ।३।

संत हाकारोनी सांगती ।
मुखीं नाम घ्यावे म्हणती ।४।

वासुदेव प्रार्थी ऐका ।
नाम घेता राहु नका ।५।

# ६. अभंग

## (चाल : सदर)

कर्मापाठीं जे लागले ।
किती आले आणि गेले ।१।

कर्म न घडे यथा विधी ।
म्हणुनी भ्रष्ट झाली बुद्धी ।२।

बुद्धी जाहली जेथें हिन ।
प्राणी पावती पतन ।३।

निष्काम घडावे ते कर्म ।
हेचि असे त्याचे वर्म ।४।

वासुदेव म्हणे मार्ग सोपा ।
नित्य हरि हरि जपा ।५।

## ७. पद (भूपराग)
## (चाल : भक्ति आकळीला दयाघन)

व्यर्थ असे घरदार ।
   जगीं बा व्यर्थ असे घरदार ।धृ.।
धन सुत जाया व्यर्थ ही माया ।
   तैसा हा संसार ।१।

लक्षाधीश तू म्हणविशी परी हा ।
   नाही तुज आधार ।ज.।२।

यत्नें रक्षीसी परी हे सर्वचि ।
   सोडुनी तुज जाणार ।ज.।३।

संतती, संपत्ती सुख हे मानीशी ।
   परी ते दु:खद् फार ।ज.।४।

नरदेहां तूं येऊनी पशुवत् ।
   करीशी हा व्यवहार ।ज.।५।

संसारीं तू भजशील जरी हरि ।
   होशील भवनदी पार ।ज.।६।

वासुदेवा वाटे हरिविण ।
   सर्वचि निराधार ।ज.।७।

## ८. पद

## (चाल : भक्ति आकळीला)

भक्तिनें भुलला हरि तो भक्तिने भुलला ।धृ.।

व्याधाचे ते आचरण कैसे ।
परी तो उद्धरिला ।ह.।१।

अल्पवयीं बहु ध्रुव तो असुनी ।
आढळपदीं नेला ।ह.।२।

विद्येने वश तरी गजेंद्रा ।
हाकेशीं आला ।ह.।३।

गजेंद्राची ज्ञाती जरी तो ।
विदुरा वश जाहला ।ह.।४।

शौर्ये हरि जरी, यादव पतीतो ।
प्रेमें रक्षीला ।ह.।५।

उग्रसेन बहु रूपवान परी ।
कुब्जेशीं वळला ।ह.।६।

द्रव्यानें वश तरी हरि नगरी ।
दिधली सुदाम्याला ।ह.।७।

वासुदेवा अनुभव एकचि ।
भक्तिपटे हरिला ।ह.।८।

## ९. पद
## (चाल : भक्तिने भुलला) भूप राग

ओळखीला हरि । ज्यानें ओळखीला हरि ।धृ.।

मानव देहीं येऊनी त्यानें ।
नेला काळ दुरी ज्याने ।१।

षडरिपु लागी जाणुनी तोची ।
जाळुनी भस्म करी । ज्याने. ।२।

निजजन सर्वचि पथिका परीतो ।
मानी संसारीं । ज्याने. ।३।

कर्म बंधने तुटुनी सुखद् त्यां ।
होती मग सारी । ज्याने. ।४।

वासुदेवा सुखानुभव हा ।
आला संसारी । ज्याने. ।५।

## १०. पद (कटाव)
## (चाल : रे मना गड्या रे सज्जना)

रे मना, मांडी कल्पना, उमज धरी काही, उमज धरी काहीं ।
या नरदेहाविण गड्या गती तुज नाही ।१।

आजवरी, जन्म किती तरी, तुझे ते जाहले, तुझे ते जाहले ।
किती सुख तुला ते सांग अनुभवा आले ।२।

मना जेथें, जन्मला तेथें, व्यर्थ तु भुलला, व्यर्थ तु भुलला ।
मी माझे म्हणुनी गड्या कसा तु फसला ।३।

आता तरी, जाण लवकरी, उमज ही माया, उमज ही माया ।
जाईल अशी ही संधी तुझी रे वाया ।४।

भुललाशीं, अरे तु ज्याशीं, कसारे मायेने, कसा रे मायेनें ।
हो सावध तु लवकरी फसशी अज्ञानें ।५।

उमजुनी, घेई समजुनी, सत्वरी आता, सत्वरी आता ।
हरिविण न सेवा कुणी तुजशी तो त्राता ।६।

वासुदेव म्हणे लवकरी, भजें तू हरि,
नाही तरी आता, नाही तरी आता ।
खाशील अंती यमलोकीं जाऊनी लाथा ।७।

## ११. पद

## (चाल : हा नको नको संसार)

टाकोनी गड्या अभिमान, भजे भगवान ।धृ.।

तो कृपा निधी शिरीं असता । वायाचि करीशी का चिंता ।
होईल तोचि तुज त्राता । विश्वास ठेवी अंतरीं,
आता लवकरी करी प्रभुध्यान ।१।

हे नश्वर जाणुनी सारे । हरिलागी शरण तु जारे ।
रक्षीता तोची तुज बारे ।
त्याविण तुज लागुनीरक्षीता कुणी नसे रे जाण ।टा. २।

तूं म्हणसी हे माझे माझे । आहे काय सांग ते तुझे ।
व्यर्थ कां घेशी शिरीं ओझे ।
तू मुढ जहाला अति, सांगावे कीती, धरीरें ध्यान ।टा. ३।

जोवरी तुझा बा प्राण । तोवरी असती हे स्वजन ।
सर्वचि स्वार्थी ते जाण । दावोनी मोह तुज बारे,
करूनी मातेरे, करीती हैराण ।टा. ४।

येऊनीया नर देहासी । मोहाच्या पडला फाशीं ।
वासुदेव सांगे तुजशीं । हो सावध तू लवकरी,
आता तरी धरी, मनीं भगवान ।टा. ५।

## १२. पद
## (चाल : गुढ्या तोरणे जिकडे तिकडे)

येऊनिया नरदेहीं तू काय सांग केले ।
उमज तू हित तरी आपुले ।धृ.।

अमोल ऐसा समय साधुनी, व्यर्थ तया दवडीले ।उ. ।१।

मायाजाळीं गुंतुनी सखया, कवण जगीं वाचले ।उ. ।२।

विषयाधिन तूं जाहला म्हणुनी, कसें तुला नाडीले ।उ. ।३।
शाश्वत सर्वचि मानुनी फसला, काय तुवां केले ।उ. ।४।

काम क्रोधाच्या आधिन होऊनी, केले कसे वाट्टोळे ।उ. ।५।

पिता पितामह किती तरी तुझे, आले आणि गेले ।
तु तरी आता सावध होऊनी साधुनी घे आपुले ।उ. ।६।

पुन्हा पुन्हा हा नरदेह बाप्पा, काही केल्या ना मिळे ।उ. ।७।

वासुदेवाच्या वचनीं वर्तुनी, साधुनी घे सगळे ।उ. ।८।

## १३. पद
## (चाल : पतित पावन नाद ऐकुनी)

सावध होऊनी नरदेही हित, साधुनी घे बाप्पा ।
नाना यत्ने चुकवी आता जन्म-मरण खेपा ।सा. धृ.।

जन्मोजन्मीं करूनी कुकर्मा जोडीयेले पापा । किती तरी भोगीसी, अजुनी सखया त्रिविध अशा तापा ।सा. १।

स्वार्थीजन हे भु लऊनी तुजला, देती भुलथापा । ज्यापरी गारूडी गाऊनी सुस्वर भुलविरे सापा ।सा. २।

वासुदेव म्हणे तु भजरे त्यां श्रीहरि बाप्पा । कलीयुगीं शास्त्री हाची बोलीला मार्ग असे सोपा ।सा. ३।

## १४. पद

## (चाल : धाव आता सखया नरहरि रे)

भज मना सतत तू हरिरे ।
जेणें तुझे होईल सार्थक रे ।भ. धृ.।

(चाल बदलून) चौऱ्याशीचे फेरे फिरता कष्ट किती
भोगीले । पूर्व पुण्य म्हणुनी गड्या मोक्षद्वार लाधले ।
आता तरी सावध तु होईरे ।भ. ।१।

आप्त इष्ट मोह गड्या तुजसी दावीती ।
साथ परी न देती कुणी, भूल पडली ही कीती ।
उमजुनी स्वहित तु साधीरे ।भ. ।२।

गर्भवास कितीरे त्रास आजुनी सोशीसी ।
दु:ख ना ठवेचि कसे रे सांग तुजसी ।
भ्रम कसा तुजसी जाहला रे ।भ. ।३।

विषयीं भुललासी म्हणुनी समज तू आता ।
कष्ट होती नाकळेचि दु:ख भोगीता ।
भूल कशी पडली ती तुजरे ।भ. ।४।
येऊनीया नरदेहीं भ्रमशी तु कसा ।
जन्म-मरण चुकवी गड्या पण करी असा ।

गोड आता शेवट तू करी रे ।भ. ।५।
वासुदेव प्रार्थी तुला समज काही तू धरी ।
फेरें फिरूनी कष्टलाशी पाहे किती तरी ।
पुन: पुन: समय हा नयेरे ।भ. ।६।

## १५. पद

### (चाल : राम रहिमा करीम केशव)

रामकृष्ण हरि गोविंद भजे तू नित्य निरंतर हेचि मनारे ।
हरिनामाविण क्षण तो एकही व्यर्थ आता तु दवडु नकोरे
। राम. धृ.।

हरि भजनाविण सखया आजवरी चौऱ्याशीचे फिरसी फेरे ।
अमोल ऐशा नरदेहाविण, जन्म मृत्युचे चुकतीन फेरे
। राम. ।१।

श्रीहरि भजनींरत तू होऊनी, सार्थक करूनी घेई आतारे ।
समज उमज तू धरीशी ना जरी ।
धडगती पुढती नाही तुझी रे । राम. ।२।

विषय सर्व हे नश्वर असुनी, भूल कशी ती पडली तुजरे ।
विषय सर्वते सेवुनी आजवरी, वीट तुला तो कसा नयेरे ।
। राम. ।३।

आता तरी तु सावध होऊनी आत्महित ते काही करोरे ।
मानुषयोनी पुढती कधीही सहजासहजी हातां नयेरे ।
। राम. कृ. ।४।

पशुपक्षादिक किटक योनी, केवळ नरक तो असेचि बारे ।
घृणीत अशा ह्या योनीमाजीं, सुख कसे ते तुज वाटेरे ।
। राम. कृ. ।५।

वासुदेव हा हित तुज सांगे, ऐके अथवा ऐकु नको रे ।
गोड करीना शेवट तू जरी, यमदुत देतील टोले तुजरे ।
। राम. ।६।

## १६. पद

## (चाल : भक्ति आकळीला दयाघन भ.)

ब्रह्मची हे सगळे, जगीं बा ब्रह्मचि हे सगळे । धृ.।

विवर्त रूपें जग भासे परी ।
स्वरूपचि ते नकळे । ज. ।१।
भूत चराचरीं, कल्लोळीं अथिं ।
जळ जैसे भरले । ज. ।२।

ब्रम्हादीं या ब्रह्मचि असुनी ।
संशयीं मन भ्रमलें ।ज. ।३।
दृष्टी व्यापुनी कवळें म्हणती ।

चंद्राशीं पिवळें । ज. ।४।
वासुदेव ब्रह्म विचारीं ।
ब्रह्मचि मन जाहले । ज. ।५।

## १७. पद
## (चाल. परवशता पाश दैवे)

ब्रह्मचि हे विश्वनोहे, काहीं विचारी मनीं ।धृ.।
हेम अलंकार पहाता, भेद बहु वाटे चीत्तां ।
परी तेथे भेद कैचा । काहीं. १।

घट मृत्तीकेशीं पाहुनी, द्वैतभाव उपजे स्वमनीं ।
घट तोची मृत्तिकाहे । काहीं. २।

रज्जुवरी सर्प भासे, ब्रह्मीं पहाता विश्वनासे ।
परी रज्जु सर्प तोची । काहीं. ३।

ब्रह्मीं पहातां वासुदेव, सत्य ज्याचा तोची देव ।
तु, मी, हे सर्व मिथ्या । काहीं. ४।

## १८. (जगदंबेची प्रार्थना)

### १. अभंग

माझें मन तुझे पायीं । ऐसे करी अंबाबाई ।।
मन माझे ते चंचल । न चले कांही तेथें बळ ।।
याच मनाचिया योगें । जन्म मृत्यु पाठीं लागे ।।
आता करी सावधान । आलो नरदेहां म्हणून ।।
वासुदेव प्रार्थी ऐका । शरण जावे त्या अंबीका ।।

### २. अभंग

शरण शरण अंबाबाई, जगज्जननी माझी आई ।।
तुजविण कोणी त्राता । सापडेना जग धुंडीता ।।
व्यर्थ भुललो संसारीं । न चुके पुढती आता फेरी ।।
काम क्रौधादि मत्सर । दैत्य मातले ते फार ।।
वासुदेव प्रार्थी ऐका । शरण जावे त्या अंबिका ।।

### ३. अभंग

धाव धाव अंबाबाई । अंत पहासी बैसुनी कायी ।।
शुंभ निशुंभ जै मातले । त्याशीं जाऊनी मर्दिले ।।
दु:ख सर्वाचे निवटुनी । येऊनी बैसली सिंहासनीं ।।
सकळ सुरवर आणि मुनी । येऊनी लागती चरणीं ।।
वासुदेव प्रार्थी ऐका । शरण जावे त्या अंबीका ।।

## ४. अभंग

अंबेनाम तुझे ते घेता । हर्ष वाटे माझीयें चिता ।।
चिंता गेली देशोधडी । नामाचिया घेता गोडी ।।
वाटे गोंधळ घालावा । शत्रु हाणुनी पाडावा ।।
उदोउदो म्हणता जाण । शत्रु पळती रानोरान ।।
वासुदेव प्रार्थी ऐका । शरण जावे त्यां अंबिका ।।

## ५. अभंग

काम क्रोधादि जाळून । भंदे हाती मी घेईन ।।
तुझीया घोषे माझे मन । विकारहिन झाले पूर्ण ।।
ऐसा प्रभाव त्यां शक्तिचा । उदो बोला चाऱ्ही वाचा ।।
तेणें तुटे भवबंधन । अंबेचा हा अभ्दुत गुण ।।
वासुदेव प्रार्थी ऐका । शरण जावे त्यां अंबिका ।।

## १९. (जगदंबेचा स्तुती पाठ व मानस पुजा)

## (चाल : उठा उठा साधुसंत साधा आपुलाले हीत)

जगज्जननी आदि शक्ति । पुजु आपण आता प्रीतीं ।
तेणें जन्म मरणाच्या पंक्ति । तुटोनी जाती सवेग ।१।

अंबे मातेवो तुज लागोनी । म्हणती त्रैलोक्य जननी ।
मधुकैठबा त्यां मर्दुनी । सुखी केले सुरवरा ।२।

चंडमुंडातें देखुनी । हुंकारेचि वधीले त्यालागुनी ।
तैचमुंडा ऐसे नाम घेऊनी । भक्त आळविती तुजलागीं ।३।

मी तो असे सामर्थ्य हिन । नसे भक्ति ना ते ज्ञान ।
कैसे करावे तव पुजन । हे तो नेणेचि सर्वथा ।४।

माझा देह तुझे देऊळ । त्यांत शक्ति असे तू सोज्वळ ।
जीव शिव हे केवळ तुझेंनी असती सर्वथा ।५।

जीवन हेची घेऊनी जळ । अहंकाराचे ते केवळ ।
चंदन घासुनी परीमळ । अंगा उटी लाविली ।६।

सुविचाराचे ते कुंकुम घेऊनी । इच्छा हेचि हहिद्रा आणुनी ।
भाळी मळवट भव्य लाऊनी । मानस पुजा ही केलीसे ।७।
भाव भक्ति पुष्पे आणून । मग अर्पियेले तुजलागून ।
तृष्णेचा तो धूप देऊन । सत्‌बुद्धि दिप लाविला ।।८।।
देहबुद्धि ती टाकून । केला नैवेद्य अर्पण ।
वाती पंचप्राणाच्या लाऊन । आरती केलीसे स्वानंदे ।।९।।

शब्द स्पर्शादि षड्‌रस । फळे घेऊनी सुरस ।
नाना विकार हे धान्य कणस ।
ओटी तुझी ती भरीयेली ।१०।

आता विकारचि गेले झाडून । मग उरले कोठे दुजेपण ।
जीवाचे गेले ते जीवपण । शिव तो होऊनी बैसला ।११।

ब्रह्मा-विष्णु आणि शिव । शक्तिविण नसे त्यां वाव ।
शक्तिविण शिव तो शव । सामर्थ्य असे हे शक्तिचे ।१२।

ऐशी सर्व शक्ति अंबाबाई । जगज्जननी माझी आई ।
वासुदेव येऊनी लवलाही । चरणीं माथां ठेविला ।१३।

## २०. (जगदंबेचा धावा)
## (चाल : विडा घ्यावो नारायणा)

धावगे अंबाबाई । जगज्जननी माझी आई ।
विनवितो दास तुझा । कर जोडुनिया पायी ।धृ.।

संसारीं दु:ख फार । होतसे अनीवार ।
कितीतरी साहुं आता । उपाय न सुचे काही ।धा. १।

आप्तइष्ट गोत कीती । सर्व सुखाचे सांगती ।
अनुभवें कळो आले । साथ कोणीना देई ।धा. २।

षड्‌रिपुनें गांजीयेले । परोपरीं दुखविले ।
सुखाचा लवलेश । मीळेनाचि करू कायी ।धा. ३।

संसारीं सुख नाही । शास्त्रादिक देती ग्वाही ।
ऐसे असोनीया । उमज पडेना काही ।धा. ४।

विषयाची गोडी फार । मनावाटे निरंतर ।
परीणाम, झणी पहातां । धडगती पुढे नाही ।धा. ५।

नको नको अंत पाहुं । कष्ट कितीतरी साहुं ।
ब्रीद हे तुझे कैसे । कळेनाचि मज काही ।धा. ६।

प्रसन्न होऊनीया । अंबा बोले हीतो माया ।
अज्ञानें भुललासी । ब्रह्मतत्त्व एकपाही ।धा. ७.।

संसार विषयासीं । आधीष्ठान ब्रह्मत्याशीं ।
रज्यु हा सर्प म्हणुनी । व्यर्थ भितोशी कायी ।धा. ८।

संसार कोणी केला । तैसा विषयाचा घाला ।
यासी निर्माण एकी केले । मग ठेवीतोसी नांवे कायी ।धा. ९।

करा संसार आवडीं हो । विषयाची गोडी घ्याहो ।
मनीं अलीप्त राहुनीया । मग दु:ख नसे कांही ।धा. १०।

वासुदेवा दु:ख वाटे । मार्गी असती बहु काटें ।
विवेकें मार्ग क्रमीतां । मुक्ति लोळे निजपायीं ।धा. ११।

## २१. पद
## (चाल : गुड्या तोरणे जिकडे तिकडे)

संत भक्त तो नरसी मेहता, आहे जुना गडी ।
माझा आहे तो जुना गडी ।धृ.।

सर्वस्वी तो अर्पुनी मजला, भजनी देत बुडी ।
आहे माझा तो जुना गडी ।१।

मायामय हे सर्वचि म्हणुनी, भजतो मज आवडी ।२।

मन्नामीं त्यां सदासर्वदा असे बहु गोडी ।मा. ३।

वासुदेव हा ऐशा संता, नमी सदा तातडी ।मा. ४।

## २२. पद (भजन)
## (चाल : कृष्ण गोविंद गोपाल)

भजा कृष्ण गोविंद गोपाल हरि ।
नित्य नेमे वदा ही वैखरी ।धृ. ।
ऐसे साधन कलीयुगीं आणिक नाही ।
नसे कष्ट ना ते नको द्रव्य काही ।
सदा राम नामीं जडो प्रित सारी ।भ. १।
असंख्यात नामे असती प्रभुचे ।
रूचे तेची घ्यावे सदा नित्यवाचे ।
सदा कर्मकरीतां जपा अंतरीं हो ।भ. २।
मुखी नाम घेता सदा गाढ वाचें ।
झणी होय सार्थक आमुच्या जीवाचे ।
अजामिळ पापी जो त्यां नाम तारी ।भ. ३।
लक्ष चौऱ्यांशी फेऱ्यातुनीं या निघावे ।
मनीं तत्व हेची सदा बाळगावे ।
स्मृती हेची ठेवा सदा अंतरींहो ।भ. ४।
नको योग यागादि कर्मे आता ही ।
शास्त्रादि देती सदा हेची ग्वाही ।
असे मुक्त जगीं या सदा नामधारी ।भ. ५।
असो रामनामीं सदा भाव ठेवा ।
झणी हेचि द्यावे मज वासुदेवा ।
पुन्हा मागुता त्यां नसे जन्म फेरी ।भ. ६।

- डॉ. यशवंत उर्फ बाळासाहेब भुसनळेकृत

# सद्गुरू वंदनाष्टक

जयाच्या कृपेने अजी धन्य झालो । अज्ञान तिमीरातुनी मी निघालो ।
दावी कृपें जो सुखानंद ठेवा । नमस्कार त्या सद्गुरू वासुदेवा ।१।

अहंभाव तो पूर्ण माझे शरीरी । असूनी कृपें जो मज अंगिकारी ।
दयेचा असे हा सदा नित्य ठेवा । नमस्कार त्या सद्गुरू वासुदेवा ।२।

नसे वेशभूषा जटाभस्मधारी । परी ज्ञान सांठा मनीं निर्विकारी ।
उपदेश ज्याचा समभाग ठेंवा । नमस्कार त्या सद्गुरू वासुदेवा ।३।

अपराध माझे कोटयानुकोटी । नेणूनीया ते सदा घालि पोटीं ।
दावी कृपे जो सुख शांती ठेवा । नमस्कार त्या सद्गुरू वासुदेवा ।४।

सेवा न मजला घडली कधी ही । परी रक्षि जो सर्व नेणूनी कांही ।
उपकार ज्याचा कसा तो फिटावा । नमस्कार त्या सद्गुरू वासुदेवा ।५।

उपकार ज्याचा कधी तो फिटेना।जरी अर्पिले त्या पदीं मी स्वप्राणा ।
म्हणूनी आतां ठेऊनी शुद्ध भावा । नमस्कार त्या सद्गुरू वासुदेवा ।६।

सन्मार्गी जेणे मज लावियेले । कृपें त्या स्वयेचि परब्रह्म केले ।
नसे ठाव आतां मनीं द्वैतभावा । नमस्कार त्या सद्गुरू वासुदेवा ।७।

ब्रह्मा नि विष्णू शिव सद्गुरू तो । असे सर्व ते एकची भास होतो ।
सदा ठेऊनीं अंतरी शुद्ध भावा । नमस्कार त्या सद्गुरू वासुदेवा ।८।

# हिंदी-विभाग

# भजन-१

## भजन - २

(तरज : सुनो ऐं साहेबो तुमको) ताल - धमाल

प्रभुका नाम लो हरदम, यही जीवन का साथी है ।।
नही है अन्य कोई साधन, कलिंजुगमे बाताया है ।धृ. ।

न है धनकी गरज इस्से, न है कुछ कष्टका कारन ।
सहजमें नाम जो लेगा, वही निजधाम जाता है ।१।

विषयका है मिठापन जो जरा तुम सोचलो इस्से ।
विषयके ध्यानसे केवल, जिवन बरबाद होता है ।२।

हमारा पूर्व सुकृत है, तभी नरतन मीला हमको ।
गमाकर व्यर्थसा इसको, आखेर पछताये जाते है ।३।

न है परिवार ये तेरा न है संसार की चीजे ।
पडां क्यौं व्यर्थ झंजट में, निकलकर सबभि जाते है ।४।

नही तू साथ कुछ लाया, न लेगा साथ कुछ अबभि ।
है नश्वर भोग सब सारे, क्यौं मतलबको मिटाता है ।५।

है वासुदेवका निश्चय सुनो तुम शांतीसे अबभि ।
जीवनमें नाम जो लेगा वही एक साथ आता है ।६।

## भजन – २
## (तरज : बने हम हिंदके योगी)

सुनो ऐ साहेबो तुमको यहाँ कुछ कार करना है,
न समझो दिलमें तुम अपने, तुम्हें आराम पाना है ।
पडे सोते हुये अबतक, जरा कुछ आँखको खोलो ।।
हुई है शाम उठ बैठो, मुसाफीर घरको जाना है ।१।

न दौलत काम आवेगी, न इस दुनियासे कुछ हासिल ।
जरा तुम सोंचकर देखो, यहाँ सब छोड जाना है ।२।

तुम्हें संसार करके इस, जहाँ मे प्यार और मोहबत ।
इबादत गर करोगें तुम, तो जन्नत घर तुम्हारा है ।३।

रघुबीर नाम है प्यारा, जो दोचखसे बचालेगा ।
जबाँसे रामहरि कहेना, मुसीबत ना मेहनत है ।४।

है वासुदेवका बाणा अगर चलते हो तुम इसपर ।
तो बेडा पार होकर फिर ये मुक्ती घर तुम्हारा है ।५।

## भजन - ३
## (तरज : क्या जरासे बात परसे)

हर समय दिलसे प्रभुकी, याद कुछ करते रहो ।
है उसीमें सार सबहि, नाम तुम जपते रहो ।धृ. ।
पाके नरतन साधलुंगा, वायदा तो खुब किये ।
भूल गये कैसे न मालुम, अबतो फिर रोते रहो ।१।

वायदा करकेभि तुमने, कुछ न किया इसलिये ।
जन्म-मृत्युके इसी चक्करमें अब फिरते रहो ।२।

क्या पडे सोते हुये तुम, खेत चिडीयाँ चुग गयी ।
पाके नरतन कुछ न किया, हात अब मलते रहो ।३।

क्यौं बहाने कर रहेहो अबभि सोंचो कुछ जरां ।
फिर न अवसर ये मिलेगा, पीछे पछताते रहो ।४।

है ये वासुदेव तुमसे क्या कहे तुम सुनतो लो ।
प्रेमसें हरदम हरिका नाम अब लेते रहो ।५।

## भजन - ४
## (तरज : सब दोस्तां है मतलबके यारो)

रामनाम तूं भजले प्यारे, व्यर्थ समय क्यौं खोता है ।
फिर न मिलेगा अवसर तुझको, काल सिरानें बैठा है ।धृ।

भुलसेभी भुलना मत तूं, समय बितता जाता है
मतलब अपना करले भाई, गफलतमें पडा क्यौं रहता है ।१।

विषयकीं धून ये निकल जावेगी पछताना फिर पडता है ।
प्रारब्ध पुरां होतेही हमारां, काल झपट ले जाता है ।२।

नही किसीका भाई बिरादर, भ्रममें क्यौं तूं पडता है ।
अपने कर्मका फल अपनेको चुपचाप सहना पडता है ।३।

जीते जी सब जोरू बच्चे, बहेन बिरादर रहते है ।
काल झपटते नही कोई रहता, मतलबे सब साथी है ।४।

चल छोड दे प्यारे तेरा मेरा, यह वासुदेवका बाणा है ।
शरण प्रभुकी लेना अच्छा जमपाश जभी कर जाता है ।५।

## भजन - ५
## (तरज : रामनाम तू भजले प्यारे)

है दुनिया ये मुसाफिरखाना, सभी यहाँपर आते है ।
सिमीत समयतक रहकर आखिर, अपने ठिकानें जाते है
है पूर्व जन्मका लेना देना एक दुसरेसे मिलते है ।
इसिके कारन मिलाप होता फिर नाता यह जुटता है ।१।

भोग भोगकर अपना अपना, ठीक समयपर जाते है ।
रोकेसेभि नही ये रूकते, यह ईश्वर की माया है ।२।

प्रारब्ध इसे है कारन सबका, आना जाना उसपर है ।
हैं ये बंधन सबके लिये तब हमभि उसिमें शामील हैं ।३।

अच्छा बुरा न कहेना किसको, प्रभु है सबका निर्माता ।
भुलकरभि तुम बुरा न कहेना, पाप बडा यह होता हैं ।४।

विष, अमृत है ईश निर्मिती अच्छा बुरा फिर कहते है ।
आच्छा बुरा कहेना ये सब, इस्तेमालपर निर्भर है ।५।

इसि तरह स्त्री विषय की, निंदा सबभि करते आये है ।
कामक्रोधादि शत्रु हमारे, भ्रम सबको यह होता है ।६।

परीवार तो मतलबका है, साथ कोई नही आता है ।
इसकाभी तो त्याग बताते, ये सब उलटा मतलब हैं ।७।

वासुदेवका अनुभव है ये प्रभु निर्मित सब आच्छा हैं ।
निमलीखीत सब देखो समझो, शास्त्र इसे बतलाता हैं ।८।

## भजन - ६
## (तरज : सब दोस्ता है मतलबके यारो)

बडे भाग्यसे नरतन पाया, विवेक प्रभुने दिया है ।
प्रभु निर्मित है सबभि आच्छा,
बुरा कहेनेकां हक क्या है ।धृ.।

बुरा जो कहते वह सब आच्छा, सूक्ष्म दृष्टीसें देखो तुम ।
जहाल विषभि देखो, समयपर अमृतसा बन जाता है ।१।
विषय और ये स्त्रीका सेवन, करो शास्त्र के सम्मतसे ।
अनुभव तुमको यही मिलेगा, यह दोनो हितकारी है ।२।
अब कामक्रोधादि शत्रु बताये इनका उपयोग योग्य करो ।
योग्य समयपर कामलेनेसे, यही सुखद बन जाते है ।३।

परीवार तो मतलबका है,
तब करलो मतलब तुमभि उसिसे ।
माता पिता और कांता सभि भी,
हितकारण सब बन जाते है ।४।
इनका त्याग तो नही हो सकता,
फिर साथी करो निजसाधनमे ।

जो हट नही सकते, उनको हटना ये कैसा हो सकता है ।५।
त्याग का मतलब हैं आसक्ति, छोडो हटाओ इसको अब ।
मै पनकोभि जडसे उखाडो, फिर यही सुखद बन जाते है ।६।
वासुदेवका है ये इशारा, सोचो समझो कुछ तो जरा
विवेक शक्तिको कभी न खोना फिर धोका मिट जाता है ।७।

## भजन - ७
## (तरज : प्रभुका नामलो हरदम)

है नरतनका सफर तेरां, तूं मतलब साधले इस्से ।
है पारस ये दिया तुझको, तूं करले कामसब इस्से ।।
हजारो जन्म ले लेकर, आया तूं मोक्षके दर पर ।
है ईश्वरकी कृपा येभी समझले तूं भी अब इस्से ।१।

सफर में कामक्रोधादि विषय का है बडा झगडा ।
है मुष्कील सामना इनका, पर लेना काम हिकमतसे ।२।

प्रभु के है ये निर्मित सब, किसीसे द्वेष मत करना ।
उसीका नाम लेलेकर, सफर कर सावधानीसे ।३।

है माता वह पिता तेरे बहन और बंधु ये कांता ।
सभी है ये तुझे साधक, आसक्ती को मिटानेसे ।४।

न चिंता कर किस की, तू है संचित साथ सबकेही ।
है संचितके आधारे सब न पड तु इसमे गफलतसे ।५।

है ये संसार के साथी, सभी है देन ईश्वर की ।
तूं सेवा कर इन्हीकी, सब तो धोका मिट गया इनसे ।६।

हैं वासुदेवकी इच्छा सफलहो ये सफर तेरां ।
हो खंडन जन्म मृत्यु का तेरा इस मार्गदर्शनसे ।७।

## भजन - ८

## (तरज : गुरूकृपा अजन पायोरे भाई)

है कौन साथी यहाँ पर तुम्हारां, यहाँपर तुम्हारा
मतलब का है ये सब खेल सारा । है. धृ.।

सब कुछ असत है जो देखते हम ।
गारूडीका है ये पुंगी पिटारा । है. १।

परीवार जोभी नाता बताते ।
मतलब उन्हीका असत हैं ये सारा । है. २।

है कोन किसका, सोचो जरां तुम ।
झंजटहि है सब ये मिथ्या पसारा । है. ३।

है वासुदेव साथी सभी का ।
आखीरका सत है ये तुमको इशारा । है. ४।

## भजन - ९
## (तरज : सब दोस्ता है मतलबके)

संसार शकट है पति पत्नीका एक दुसरे पर निर्भर है ।
सत्ता जबतक है दोनोकी सौंदर्य तभीतक इसका है । धृ.।

एक दुसरे का वियोग होते, संसार शकट तुट जाता है ।
है दोनोकी सत्ता जब तक वे खटके ये चलता है ।१।

पत्नी बिना पती जीवीत होकर, निष्प्राण वही बन जाता है ।
पत्नीभीतो बिना पतीके समान मृतके होती है ।२।

देव असूर हो मानव कोईभी, पत्नीबीना पती आधा है ।
सभी जगतमे हो कोई उसपर इसी नियमका बंधन है ।३।

राधे बिन है श्याम आधे, आधे है रघुबीर सिता बिन ।
फिर वासुदेवका आधा होना इसी नियमके आधीन है ।४।

## भजन - १०
## (तरज : रामनाम तू भजले प्यारे)

प्राणी मात्रसें कभि न करना कीसी तऱ्हेकी दिलमें आस ।
आत्म सुखका यत्न करो तुम, रहेता जो है अपने पास ।१।

नश्वर सुख जो दिलमें चहाता, है उसकी ये झुटी आस ।
पस्ताये फिर रहेता आखेर, सदा जीवनमें वह निरास ।२।

जो कुछभि है तुमको प्रतिकूल, उसे न बर्तों किसी के साथ ।
यही धर्मका मूल समझना शास्त्रोंकी है ये सब बात ।३।

दोष न देखो कभी किसी के, प्रभु है सबका निर्माता ।
अपनेमें तुम सबको देखो यही समझकर परमात्मा ।४।

बुरा न करना कभि किसीका, ये है प्रभुका सब सन्मान ।
प्रेमभरें तुम सबसे बर्तो, करलो इसीमें तुम कल्याण ।५।

जीवमात्रमें प्रभु भरां है, कभी न भुलो इसको अब ।
नरतन पाकर समझे नही जब, समझोगे फिर इसको कब ।६।

अनुभव की है ये सब बाते शास्त्र इसीको है आधार ।
सोचोगें तुम समझोगे तब पार करोगें यह संसार ।७।

वासुदेवका है ये इशारा मानो या मत मानो तुम ।
मजबुर किसीको करना नही, ये कर्तव्य हमारा करते हम ।८।

## भजन - ११
## (तरज : रामनाम तूं भजले प्यारे)

कामक्रोध मद मोह भरा हो दिलमे जिसके ये सब खान ।
पंडीत होना मतलब नही कुई पंडीत मुरख दोनो समान ।१।

कुष्टी भला जो नाम जपत है, गिरे जो उसके चुई चुई चाम ।
कांचन देहसे कामहि क्या है? मुखमें नही हैं जिसके राम ।२।

भक्त बडे है साधे सिधे, होते ज्ञानी निःखट्टु ।
कर्मकांडी तो अभिमानी सब है, भाडेके ये तट्टु ।३।

प्रभुबिन जग ये नही है खाली, फिरभि धुंडते इधर उधर ।
माया मोहमें अंधे बनकर, सुखी न होते जीवन भर ।४।

चिंता क्यौ करना किसकी, प्रभु है सबका रक्षितां ।
कर्मोंके अनुसार जो कुछ, जीसका उसको पोंहचाता ।५।

लिखा न मिटे कभी किसीका, जो है लिखा विधीके हात ।
पूर्वके बदले पश्चीममें कभी कैसी कैसी होगी वह प्रभात ।६।

वासुदेवका अनुभव है ये करो इसिपर तुम विश्वास ।
पार करोगें भवसागर फीर, सुखी बनोगे तुम्भी खास ।७।

## भजन १२ (हमारा जीवन)

(तरज । ईश्वर को जान बंदे मालीक तेरा वोही है)

जीवन हमारा क्यौंकर, दुखसे भरा हुवा है ।
सोचों जराभि इसमें, कारण इसे हमि है ।१।

टचभितो पहीले होता, आच्छा बुरा हैं जोभी ।
फिर करना नही सो करके, रोते है फीर सभीभी ।२।

दुख भोगके समय फीर, मर्जी प्रभुकी कहते ।
करके यही बहाना, अपना आयब छुपाते ।३।

धोका प्रभुको देकर, क्या वह कृपा करेंगे ।
रोना पडेगा हमको, रोतेही फीर रहेंगे ।४।

## धनकी करामत
## भजन - १३
## (तरज : सदर)

धन तो बडा बुरा है, इसके न पीछे पडना ।
परीणाम जोभी होता, उसका नही ठिकाना ।१।

एकी उदरमें पैदा होकरभि भाई भाई ।
धनके लीये उन्हीकी, होती सदा जुदाई ।२।

माता पिता बहेन सब, चक्करमें इसके आते ।
क्या खुब है करामत, धनकी नही समझते ।३।

# भजन - १४
## तृष्णासे हानी
### (तरज : ईश्वरको जान बंदे)

तृष्णाका बीज कहांसे, भारतमे कैसा आया ।
पाश्चात्य वासीयोनें, आकरके बोया ।१।

तृष्णाकी बेल क्या खुब, दुनयामे फैल गयी है ।
अज्ञान वश सभी इस फंदेमें फस गये है ।२।

फिर शांती शांती कहते, चारो तरफ भटकते ।
शांती मिले कहाँसे, उदास हो बैठते ।३।

तृष्णासे सुख शांती क्या वह कभी मिलेगी ।
सूरजमें वह सितलता कैसी कहां रहेगी ।४।

शांतीके तुम हो सागर, क्या ढुंडते हो बाहेर ।
बाहेर न धुंडो भितर, तृष्णाको ये मिटाकर ।५।

तृष्णाके बिन मिटाये, शांती न वह मिलेगी ।
मिले बिगर किसीको, टीके न वह रहेगी ।६।

## भजन - १५

## मन मायाका प्रभाव

**(तरज : सदर)**

मापा है मोहनी ये, है चोर ये बडा मन ।
ज्ञानीभि डुब मरे सब, अमोल पाके नरतन ।१।

मनकोही मार डालो, चेष्टा यही करो अब ।
फिर मुक्ति घर तुम्हारां, सुविधायें फीर बने सब ।२।

## भजन - १६
## संसार
### (तरज : ईश्वरको जान बंदे)

संसार तो भरा है, विषयोसें चौतरफसे ।
प्रारब्धवश हमेभि होना है पार इस्से ।१।

होता है पार वोही, विष जो विषयको माने ।
संसारको भी जाना, हरिरूपहि जिस किसीने ।२।

दुखकी तो जड है हमही, दुनीया न ये समझती ।
अपने किये कराये, यह सबभि भूल जाती ।३।

नितकर्म जो हमारा, कहते है ये पसारा ।
समझे नही है हमभी, कर्तव्य यह हमारा ।४।

नश्वरमें जो आसक्ती, रखकर प्रभुको चाहते ।
एकी समयमें कैसा, दिन रात कों बुलाते ।५।

दुखका यहीं है कारण, कर्तुत ये हमारा ।
होकर उदास कहेते, प्रभुका है खेल सारा ।६।

सच छुट किसमें क्या है, दिलसेही हम समजते ।
दुखका विषय यही है, फीर करना नही सो करते ।७।

## भजन - १७
## मांग होना तो ऐसी
## (सुबोध पंक्ति)

इच्छा है एक मनमें, पुरी करो मुरारी ।
इच्छा रहे न मनमें, फिर याद हो तुम्हारी ।१।

भुलेसे भुलना मत, स्मशान घर अपना ।
माडी महेल सबीभी, एकदिन है छोड जाना ।२।

आती है चीज जोभी, जानेके लिये आती ।
इतना नही समझकर, बेकार दुनिया रोती ।३।



# * कृष्ण गोविंद गोपाल गाते चलो *

कृष्ण गोविंद गोपाल गाते चलो ।
मनको विषयोंके विषसे हटाते चलो ।।धृ.।।

इंद्रियोके न घोडे विषयो मे अडे ।
जो अडे भी तो संयमके कोडे पडे ।
तनके रथको सुपथपर चलाते चलो ।।१।।

नाम जपते रहो काम करते रहो ।
पापकी वासनाओसे डरते रहो ।
सद्‌गुणोका परमधन कमाते चलो ।।२।।

लोग कहते है भगवान आते नही ।
रूक्मिणीकी तरह हम बुलाते नही ।
द्रौपदीकी तरह धून लगाते चलो ।।३।।

लोग कहते है भगवान खाते नही ।
भिल्लीणीकी तरह हम खिलाते नहीं ।
शाकप्रेमी विदूरसम जिमाते चलो ।।४।।

दुख से तडपे नही सुखमे फुले नहीं ।
प्राण जाये मगर धर्म भुले नही ।
धर्म धनका खजाना लुटाते चलो ।।५।।

वक्त आवेगा ऐसा कभी ना कभी ।
हमभि पायेंगे प्रभुको कभीना कभी ।
ऐसा विश्वास दिलेमे जमाते चलो ।।६।।

## संत श्री प. पू. गुरूवर्य कै. वासुदेवराव देव यांना श्रद्धांजली

मानसन्मान लाभो देवा, नसे कशाचि हाव । निरंतर राहो ओठी, वासुदेव नांव ।।धृ।।

विश्व व्यापुनी उरलेला ईश निराकार ।
भक्तासाठी अवतरूनी तू आला या भूवर ।।
कृपादृष्टी भक्तावरी समान रंक राव ।
निरंतर राहो ओठी, वासुदेव नांव ।।१।।

मोहजाल मायेचा हा खेळ असे सारा ।
भक्तासाठी तूच देशी, सदा रे निवारा ।।
तुझ्या कृपे सुरळीत चाले, संसाराची नाव ।
निरंतर राहो ओठी, वासुदेव नांव ।।२।।

जीवनांत सुखदु:खांच्या संगती चालणे ।
हार जीत लाभ नि हानी सारखे जाणणे ।।
स्थित प्रज्ञ व्हावे ऐसे, गितोपदेशी मानव ।
निरंतर राहो ओठी, वासुदेव नांव ।।३।।

कमलपत्र जली जैसे, संसारी असावे ।
सर्वामध्ये राहूनिया अन् कोणाचे नसावे ।।
ऐसा करिती उपदेश, सदा गुरूदेव ।
निरंतर राहो ओठी, वासुदेव नांव ।।४।।

कर्म करी तूं सदैव, नको धरू फळाशा ।
हीच शिकवण गीता सांगे, आवडे जी ईशा ।।
भाव ठेवुनी वासुदेवा, उद्धरले पांडव ।
निरंतर राहो ओठी, वासुदेव नांव ।।५।।

तूच ब्रह्म विष्णू महेश, भक्तांचा नियंता ।
माझेपण निव्वळ खोटे, व्यर्थ ही अहंता ।।
अंतरांत नांदो नित्य, तुझा भक्ति भाव ।
निरंतर राहो ओठी, वासुदेव नांव ।।६।।

नाम भक्तिचे दृढ घेता, नित्य ईश सेवा ।
सहज साध्य होतो दिव्य मुक्तिचा तो ठेवा ।।
गुरूपदेश ऐसा तुझा. जपू नित्य भाव ।
निरंतर राहो ओठी, वासुदेव नांव ।।७।।

रामकृष्ण हरी नामाचा सदा जडो छंद ।
तेणे होईल अवघ्या जीवनी आनंद ।।
भक्तासाठी घेती सदा, वासुदेव धांव ।
निरंतर यशवंत ह्रदयी वासुदेव नांव ।।८।।

**डॉ. यशवंत बाळासाहेब भुसनळे**
**एरंडोल जि. जळगांव**